# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## प्रकटीकरणाचा सण

## ०३ जानेवारी २०२१

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, आमच्या तारणा-या परमेश्वराची दया आणि प्रेम आम्हामध्ये प्रकट झाले आहे. आपल्या स्वतःच्या सत्कृत्यांवर नव्हे तर अखिल मानवजातीवरील त्याच्या प्रेमावर विश्वास ठेऊन आपण आपल्या प्रार्थना परमेश्वराला अर्पण करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. अखिल ख्रिस्तसभेची त्यागाद्वारे सेवा करणारे आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रेषितीय कार्य करण्यास परमेश्वराची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या देशात व जगात सत्याचे, न्यायाचे व शांतीचे राज्य प्रस्थापित व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ज्ञानी पुरूषांनी ज्या आंतरिक प्रेरणेने ख्रिस्ताचा शोध घेतला तिच आंतरिक प्रेरणा आपल्याला लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामातील सर्व कुटुंबांवर परमेश्वराचा आशीर्वाद असावा, आपल्या युवकांना, बालकांना कुटुंबामध्ये चांगले मार्गदर्शन लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी, निराश्रित व निराधार लोकांना घडावा, कोरोना विषाणुपासून व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या / आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे प्रभो परमेश्वरा, प्रेमाने आणि आपले कौमार्य न गमावता मरियेने आमचा प्रभू आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला जन्म दिला. तिला आमच्या प्रार्थना तुझ्यासमोर सादर करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.